

# मेट्रो स्थानकांवर आता स्वयंचलित भाडेआकारणी

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गातील सर्व स्थानकांवर स्वयंचलित भाडेआकारणी यंत्रणा उभारण्यासाठी कॉर्पोरेशनने कालिंदी एसीएस समूहाची नियुक्ती केली आहे. आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ही नियुक्ती झाली आहे. मेट्रोच्या २७ स्थानकांच्या स्वयंचलित भाडेआकारणी यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना व चाचणीचे काम ही कंपनी करेल.

सर्व प्रकारच्या सार्वजनिक वाहतुकीसाठी एकच तिकीट असण्यासाठी एकात्मिक तिकीट प्रणाली असावी यासाठी 'एमएमआरडीए' यंत्रणा उभारत आहेत. सध्या वेगळवेगळ्या सार्वजनिक वाहतुकीसाठी प्रत्येक वेळी त्या-त्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे तिकीट काढावे लागते. या प्रक्रियेत प्रवाशांचा बराच वेळ खर्च होतो. सध्या मुंबईत रेल्वे, बस या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसह मोनो व मेट्रो सेवा सुरू आहे. भविष्यात मेट्रोचे मुंबईसह परिसरात सात प्रकल्प आकारास येणार आहेत. याशिवाय जलवाहतूक, शिवडी-न्हावा शेवा ट्रान्स हार्बर लिंक आदी आणखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे पर्याय उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे या सर्व प्रवासासाठी एकच तिकीट असावे, असा प्रयत्न आहे. केंद्र सरकारही 'एक राष्ट्र एक कार्ड' असा प्रयोग करत आहेत. या पार्श्वभूमीवर मेट्रो कॉर्पोरेशनची स्वयंचलित भाडेआकारणी यंत्रणा पूरक ठरणार आहे.

## मेट्रो-3 मार्गासाठी योजना

**स्वयंचलित भाडेआकारणी यंत्रणा मेट्रो-३साठी अत्यंत महत्त्वाची असून, त्यामुळे प्रवाशांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध होईल. तसेच प्रवाशांच्या वेळेतही बचत होईल. मेट्रो-३ प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी ही यंत्रणा उभारण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

- **अश्विनी भिडे**, व्यवस्थापकीय संचालक-मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन